International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# पेसा कायदा व आदिवासी समाजाची स्वशासन व्यवस्था

**डॉ. बांगर नितीनकुमार बाबासाहेब**
*सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख*
*राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई रोड (प) जि.पालघर-४०१२०२.*
*Corresponding Author – डॉ. बांगर नितीनकुमार बाबासाहेब*
**DOI - 10.5281/zenodo.17656301**

**प्रस्तावना:**

पेसा (पंचायत क्षेत्र विस्तार कायदा) हा आदिवासी समाजाच्या स्वशासन व्यवस्थेसाठीचा अत्यंत महत्त्वाचा असा कायदा आहे. आदिवासी समाजाचे जीवन हे प्रामुख्याने जल, जंगल व जमीन याच्यांशी निगडित असल्याने या कायद्याच्या आधारे आदिवासी समाजाच्या विविध समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. या कायद्याच्या आधारे आदिवासी क्षेत्रातील नैसर्गिक संसाधनांचा वापर शाश्वत विकासासाठी केला गेल्यास त्यातून त्यांना रोजगाराची व विकासाची संधी निर्माण करून देता येईल. त्यामुळे आदिवासींचे जीवन स्वावलंबी होण्यास खूप मोठी मदत होऊ शकते. तसेच आदिवासी समाजासाठी त्यांची स्वशासन व्यवस्था निर्माण करणे सोपे होईल.

आदिवासी समाजाची स्वशासन व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने सन २०१५ मध्ये एक महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला. केंद्र सरकारच्या ग्रामविकास विभागामार्फत गठीत करण्यात आलेल्या अभ्यास समितीच्या शिफारशीला अनुसरून केंद्र सरकारने पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा) पारित केला. सदर कायद्याला 'आदिवासींचा स्व-शासनाचा कायदा' म्हणून ओळखले जाते. त्यामध्ये अनुसूचित क्षेत्रातील पेसा गावांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपयोजनेतील पाच टक्के निधी देऊन त्या गावातील विकास कामे त्यांनाच करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. या निर्णयामुळे अनुसूचित क्षेत्रातील पेसा गावांना आपल्या समाजाची स्वशासन व्यवस्था स्थापन करणे सहज शक्य होणार आहे. या निर्णयाप्रमाणे राज्य शासन ग्रामसभेला दरवर्षी निधी उपलब्ध करून देईल. सदर निधी ग्रामपंचायत शाखांच्या गावाच्या ग्रामकोशाच्या खात्यामध्ये थेट जमा करण्याची तरतूद आहे. हा निधी प्राप्त झाल्यानंतर ती रक्कम कशा प्रकारे व कोणत्या बाबीवर खर्च करावी यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभांना दि. २१ एप्रिल २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रदान करण्यात आला आहे. त्यासाठी काही मार्गदर्शक सूचनाही संबंधित विभागाला देण्यात आलेल्या आहेत.

थोडक्यात ग्रामसभा त्या गावाच्या बाबतीतील सर्व निर्णय स्वतःच घेईल. यामध्ये शासनाचा हस्तक्षेप राहणार नाही, अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे या शासन निर्णयाप्रमाणे ग्रामसभा गावचा पंचवार्षिक आराखडा तयार करून, त्याला मंजुरी देऊ

शकेल व त्यामार्फत आपल्या स्वतःच्या गावाचा विकास घडवून आणू शकते.

**गृहीतके:**

१) पेसा कायद्याद्वारे आदिवासी समाजाची स्वशासन व्यवस्था स्थापन करणे शक्य आहे.

२) आदिवासी समाजाची स्वशासन व्यवस्था स्थापन करण्यामध्ये ग्रामसभेची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.

**पेसा कायद्याची अंमलबजावणी:**

सन १९९६ मध्ये पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा) पास झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने त्या कायद्याविषयीचे नियम तयार करणे गरजेचे होते. त्यालाच अनुसरून महाराष्ट्र शासनाने ४ मार्च २०१४ रोजी पेसा कायद्याचे नियम प्रसिद्ध केले. कायद्यातील तरतुदीला अनुसरून आदिवासींच्या हिताचे रक्षण करुन आदिवासी समाजाची स्वशासन व्यवस्था निर्माण करून तिला कशी बळकटी देता येईल याविषयी विशेष काळजी घेण्यात आली आहे. पेसा या कायद्यात एकूण बारा प्रकरणे असून यामध्ये आदिवासी समाजाच्या स्वशासन व्यवस्थेसंबंधीच्या विविध तरतुदींचा समावेश करण्यात आलेला आहे. पेसा कायद्याला 'आदिवासींचा स्वशासनाचा कायदा' म्हणून ओळखले जाते. ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार ग्रामसभेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला असून पंचायतराज संस्थेला मोठ्या प्रमाणात अधिकार देण्यात आले आहेत.

**पेसा कायद्याची अंमलबजावणी:**

सन १९९६ मध्ये पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा) पास झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने ४ मार्च २०१४ रोजी पेसा कायद्याचे नियम प्रसिद्ध केले. आदिवासी समाजाची स्वशासन व्यवस्था निर्माण करण्याबाबतच्या या कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

**अनुसूचित क्षेत्रातील गाव घोषित करणे:**

आपल्या वस्तींची किंवा पाड्यांची गाव म्हणून नोंदणी करण्यासाठी त्या पाड्यांच्या गटाच्या मतदार यादीत नाव नोंदवलेल्या मतदारांच्या बहुमताने ठराव पास करून जिल्हाधिकाऱ्यामार्फत तो ठराव उपविभागीय अधिकाऱ्याकडे पाठविला जातो. उप विभागीय अधिकारी तीन महिन्यांच्या आत सर्व कायदेशीर बाबींची कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाअधिकाऱ्याला सादर केला जातो. नवीन गाव अधिसूचित करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याची खात्री पटल्यानंतर अधिनियमाच्या प्रकरण तीन-अ प्रमाणे गाव जाहीर करण्यात येते.

**ग्रामसभेची रचना व कार्यपद्धती:**

'ग्रामसभा' याचा अर्थ ग्राम स्तरावरील ग्रामपंचायतीच्या मतदार यादीमध्ये ज्यांची नावे समाविष्ट आहेत अशा सर्व व्यक्तींची मिळून बनलेली 'अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा' असा आहे. पंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असेल. ग्रामसभेची प्रत्येक बैठक किंवा कार्यवाही जाहीरपणे आयोजित करण्यात येईल. ग्रामसभेच्या बैठका सरपंचाच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येतील. तसेच ग्रामसभेचे सर्व कामकाज सर्व संमतीने चालविण्यात येईल. सर्व निर्णय बहुमताच्या आधारे घेतले जातील. ग्रामसभा गावाच्या कारभारासाठी विविध स्थायी समित्यांची स्थापना करेल. याशिवाय गरजेनुसार तात्पुरत्या समित्या देखील स्थापन केल्या जातील. प्रत्येक समितीतील सदस्यांपैकी निम्मे सदस्य हे महिला सदस्य असतील. समित्यांनी

घेतलेल्या निर्णयांची नोंदवहीमध्ये नोंद करण्यात येईल व हे सर्व अभिलेख सर्व ग्रामस्थांसाठी खुले असतील. तर पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच शासनाने नियुक्त केलेल्या इतर अधिकाऱ्यांसाठी तपासणीसाठी खुले असतील. याशिवाय ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध आक्षेप घेण्याची व अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांच्या संयुक्त बैठका घेण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

**ग्रामसभा कोष:**

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा एक 'ग्रामसभा कोष' ठेवील. या कोषामध्ये सर्व रोख रकमा व इतर अंशदानाचा समावेश असेल. यामध्ये विविध गोष्टींपासून मिळालेल्या रकमा यांचा समावेश असेल. ग्रामसभेला तिच्या ठरावानुसार कोषाचा वापर करण्याचा संपूर्ण अधिकार असेल. ग्रामसभा कोशाचे लेख हे ग्रामसभेच्या कोष समितीच्या सदस्याकडून एका नोंदवहीत ठेवण्यात येतील. प्रत्येक ग्रामसभा जमा व खर्चाचा एक स्वतंत्र लेखा ठेवेल. हे लेखे संबंधित ग्रामसभेकडून प्रमाणित करण्यात येतील. हे सर्व लेखे पंचायत समिती, जिल्हा परिषद व स्थानिक निधी प्राधिकारी यांच्या लेखापरीक्षणाच्या आधीन असतील.

**शांतता, सुरक्षितता व तंटामुक्ती**:

अनुसूचित क्षेत्रामध्ये शांतता व सुरक्षितता राखण्याचे कार्य ग्रामसभेला करावे लागते. यासाठी पेसा कायद्यातील १८(१) च्या तरतुदीला अनुसरून 'शांतता समितीची' स्थापना केली जाते. अनुसूचित क्षेत्रांमध्ये शांततापूर्ण वातावरण ठेवणे, प्रत्येक नागरिकाच्या स्वातंत्र्याची जोपासना करणे व महिलांच्या प्रतिष्ठेच्या आड येणाऱ्या समाजविघातक प्रवृत्तींना पायबंद घालणे अशी महत्त्वाची कार्य या समितीला करावी लागतात. गावाच्या शांततेला बाधक ठरणाऱ्या घटकांची चौकशी करून, संबंधित घटकाचे समुपदेशन करण्याचे कार्य ही समिती करते. थोडक्यात गावामध्ये निर्माण होणारे विविध वाद-विवाद या समितीमार्फत सोडविले जातात. सदर समिती पेसा कायद्यातील १८(३)(दोन) नुसार 'लवाद' म्हणून कार्य करते.

याशिवाय पोलीस ठाण्यामध्ये सर्व प्रकारच्या गुन्ह्यांसंबंधात नोंद झालेल्या अहवालाची एक प्रत ग्रामसभा किंवा शांतता समितीला पाठविण्याची तरतूद १९ मध्ये आहे.

**नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण, नियोजन व व्यवस्थापन:**

स्थानिक परंपरेनुसार ग्रामसभेच्या क्षेत्रात असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर ग्रामसभेचा अधिकार असतो. अशा साधनसंपत्ती बाबत संरक्षण उपायोजना करून त्याचे जतन करण्याचे कार्य ग्रामसभेला करावे लागते. हे करताना ही साधनसंपत्ती काही लोकापुरतीच मर्यादित न ठेवता शाश्वतेचा विचार करून सर्व लोकांमध्ये या स्थानिक साधनसंपत्तीचा पूर्ण विनियोग कसा होईल याविषयी तिचे योग्य व्यवस्थापन करण्याचे कार्य ग्रामसभेला करावे लागते. साधनसंपत्तीचे योग्य प्रकारे नियोजन व व्यवस्थापन करून संबंधित साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर होणे आवश्यक असते. याला अनुसरुनच साधनसंपत्तीचा योग्य प्रकारे विनियोग होतो की नाही याविषयी खात्री करण्यासाठी पेसा कायद्याच्या २१(१) अंतर्गत एक 'साधनसंपत्ती नियोजन व्यवस्थापन समिती' असते. ही समिती सर्व साधनसंपत्तीच्या कायमस्वरूपी उपयोगाला जास्त महत्त्व देते. थोडक्यात शाश्वत शेतीचा विचार करून, स्थानिक साधनसंपत्तीचा पूर्ण विनियोग करण्याचा अधिकार ग्रामसभेला देण्यात आलेला आहे.

**भू-व्यवस्थापन जमिनीच्या बेकायदेशीर हस्तांतरावर निर्बंध:**

आदिवासी लोकांपैकी जवळजवळ ९७ टक्के आदिवासी समाज आपल्या उपजीविकेसाठी जमिनीवर व जंगलावर अवलंबून आहे. याला अनुसरूनच पेसा कायद्यातील कलम २२ ते २६ पर्यंत शेतीकरिता नियोजन करणे, भू-व्यवस्थापन, जमिनीच्या अन्य संक्रामनास प्रतिबंध, आदिवासींच्या जमिनी परत करणे व भूमी संपादनापूर्वी विचार विनिमय अशा विविध गोष्टीबाबत तरतुदी आहेत. पेसा कायदा नुसार आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवासी लोकांकडे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्यास व ग्रामसभेने मूळ आदिवासीला जमीन परत करा असा ठराव पास केल्यास तो ठराव जिल्हाधिकाऱ्यांवर बंधनकारक असेल अशा प्रकारची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे. या तरतुदीचा वापर करून आदिवासींच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण रोखणे सोपे झाले आहे. तसेच आदिवासींच्या जमिनी अधिक उपजाऊ केल्यास व जमिनीशी व जंगलाशी संबंधित रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यास आदिवासींच्या आर्थिक विकासाला चालना मिळून त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

**प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन:**

विकास प्रकल्पासाठी जमीन संपादन करणारी एजन्सी पुनर्वसनासंबंधातील सर्व तपशील ग्राम सभेसमोर ठेवील. त्याची सविस्तर नोंद कार्यवृत्तांमध्ये केली जाईल.

**जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन:**

जलस्त्रोतांवर सर्व ग्रामस्थांचा समान अधिकार असेल. तसेच हे जलस्त्रोत भावी पिढ्यांकरिता अक्षत राहतील अशा प्रकारे जलस्त्रोतांच्या वापराचे नियोजन करणे आवश्यक असेल. ग्रामसभेला पाणी वापराच्या प्राधन्यक्रमाविषयी निर्णय घेता येईल. याशिवाय सिंचनाचे व्यवस्थापन, गौण जलस्त्रोतांचे व्यवस्थापन व इतर सामुहिक संपत्तीचे व्यवस्थापन व वापर ग्रामसभेच्या सामुहिक निर्णयानुसार करण्यात येईल अशी तरतूद या कायद्यात आहे.

**गौण खनिजांसाठी योजना तयार करणे:**

ग्रामसभा ही तिच्या कार्य क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या सर्व प्रकारच्या गौण खनिजां करिता जसे की माती, दगड, वाळू इत्यादी सर्व गौण खनिजांचे उत्खनन व वापर यासाठी योजना करून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम असेल अशा प्रकारची पेसा कायदा ३२(१) मध्ये तरतूद आहे. याला अनुसरून गौण खनिजांच्या पट्ट्यामध्ये पर्यावरणाचं संरक्षण करणं, रोजगार त्याचबरोबर गौण खनिजांचा व्यापारी दृष्टीने वापर यावर समितीचे नियंत्रण असते. थोडक्यात पेसा कायद्याप्रमाणे गौण खनिज यांचा लिलाव करायचा असेल किंवा त्यासाठी लीजवर जमीन द्यायची असेल तर ग्रामसभेची, योग्य त्या स्तरावरील पंचायतराज संस्थेची शिफारस घेणे आवश्यक असते. ग्रामसभेच्या मान्यतेनंतरच महसूल विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते. परंतु ग्रामसभेने नकार दिल्यास लिलाव किंवा भाडेपट्टा करता येणार नाही. एकंदरीत संबंधित खानिकर्म विभागाला पेसा कायद्यातील ३२ (२) नुसार ग्रामसभेची पूर्ण मंजुरी घेणे आवश्यक असते.

**मनुष्यबळ नियोजन:**

शासनाच्या विविध योजनांनुसार कार्ययोजना तयार करून,गावातील मनुष्य बळाचा पुरेपूर वापर करून त्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य ग्रामसभेला करावे लागते. हे करताना लोकांमध्ये सहकार्याची भावना उत्पन्न करून ज्ञान व काम यांची परस्पर देवाणघेवाण करण्यावर भर दिला जाईल. गावाबाहेरील कोणत्याही कामगाराला कमावर

घेण्यापूर्वी ग्रामसभेला त्याविषयी संपूर्ण माहिती देऊन तिची परवानगी मिळविणे अनिवार्य आहे.

**मादकद्रव्य नियंत्रण:**

ग्रामसभा तिच्या अधिकारक्षेत्रात मादकद्रव्याशी संबंधित उत्पादन, विक्री, वितरण, सेवन व साठा यावर नियंत्रण ठेवेल.यासाठी मादकद्रव्य नियंत्रण समितीची स्थापन करण्यात येईल.या समितीतील किमान निम्मे सदस्य महिला असतील. अनुसूचित क्षेत्रामध्ये मादक पदार्थांची निर्मिती करणारा कारखाना किंवा दुकान सुरु करण्यास व ते चालू ठेवण्यास ग्रामसभेची मान्यता अनिवार्य असेल.

**गौण वनोत्पादनाचे व्यवस्थापन:**

अनुसूचित क्षेत्रातील सर्व गौण वन उत्पादनाचे व्यवस्थापन ग्रामसभेकडे विहित असेल अशा प्रकारची तरतूद पेसा कायद्याच्या ४१(१) मध्ये आहे. थोडक्यात पेसा कायद्यानुसार वनातील सर्व गौण वन उत्पादने गावाच्या मालकीची झाली आहेत. त्याचप्रमाणे वन हक्क कायद्याने देखील हे अधिकार गावाला प्रदान केलेले आहेत. मात्र वन हक्क कायद्यातील तरतुदीप्रमाणे खातरजमा करून हे अधिकार प्राप्त करून घ्यावे लागतील. बहुतांश आदिवासी रोजगारासाठी व आर्थिक उन्नतीसाठी गौण वन उत्पादनावर अवलंबून आहेत. जंगलामध्ये विविध प्रकारची गौण वनउपज असतात. ही गौण वनउपज आहेत त्यास्वरूपात विकल्यास त्याचा फारसा फायदा आदिवासींना होत नाही. मात्र त्यावर प्रक्रिया केल्यास त्याची गुणवत्ता व किंमत वाढवून मिळते व त्याचा लाभ आदिवासींना होऊ शकतो. यासाठी आदिवासी भागात पायाभूत प्रक्रिया सुविधा निर्माण करणे, कौशल्यवृद्धी करण्याचे प्रकल्प हाती घेणे व पक्या मालासाठी लागणारी बाजारपेठ निर्माण करण्यासाठी ग्रामसभेला साह्य करणे आवश्यक आहे.

**बाजारांचे व्यवस्थापन:**

ग्रामसभा तिच्या क्षेत्रातील बाजारांना मान्यता देण्यास, त्यांचे व्यवस्थापन करण्यास व त्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम असेल. बाजारातील सर्व व्यवहार नियमानुसार होतील तसेच बाजारातील हानिकारक वस्तूंची आवक व विक्री यास प्रतिबंध घालण्याचे अधिकार ग्रामसभेला आहेत.

**आदिवासींच्या शोषणास प्रतिबंध:**

आदिवासींचे विविध घटकाकडून विविध मार्गांनी होणारे शोषण होताना दिसते. अनुसूचित क्षेत्रांमधील सावकारी व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने ग्रामसभा तिच्या सदस्यांमधून पेसा कायद्यातील तरतूद ४४ (१) नुसार एक 'कर्ज नियंत्रण समिती' तयार करू शकते व त्या समितीमार्फत विविध घटकांकडून जसे की, सावकार, जमीनदार, व्यापारी, ठेकेदार इ. आदिवासींचे होणारे शोषण थांबविण्यासाठी उपाय योजना केल्या जातात.

**लाभार्थ्यांची निवड करणे:**

आदिवासी विकासासाठी शासनाच्या विविध विकास योजना असतात. शासनाच्या योजना, सूचना व निर्देश यांची एकरूपता लक्षात घेऊन गावातील कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा विचार करून त्यामधून लाभार्थ्यांची निवड करण्याचे कार्य ग्रामसभा करते. अशा प्रकारचे अधिकार पेसा कायद्यांतर्गत ग्रामसभेला देण्यात आलेले आहेत. विकास आराखडा तयार करणे, लाभार्थ्यांची निवड करणे, कामाला मंजुरी देणे, खर्चासाठी निधी देणे, विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे अशी विविध कार्ये ग्रामसभेला करावी लागतात. थोडक्यात शासकीय योजनांचा व स्थानिक नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर

करून त्याचा गरजूंना फायदा मिळवून देणे ही महत्वाची कामे ग्रामसभेला देण्यात आली आहेत.

**सामाजिक विकास कार्यक्रमावर नियंत्रण:**

पंचायत क्षेत्र विस्तार कायद्याच्या ५१ व्या तरतुदीनुसार एका 'दक्षता व सनियंत्रण समितीची' स्थापना करण्याचा अधिकार ग्रामसभेला देण्यात आलेला आहे. या समितीमार्फत विविध शैक्षणिक व आरोग्यविषयक कामांचे वेळोवेळी परीक्षण करण्याचे काम समितीमार्फत केले जाते. एकंदरीत ही समिती स्थानिक संस्थेच्या सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या कार्ये करण्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य करते.

**राज्याचे प्रचलित कायदे व पेसा कायदा:**

राज्याच्या विद्यमान कायद्याच्या कोणत्याही तरतुदी अनुसूचित क्षेत्रात विस्तारित होत असताना त्या तरतुदी पेसा कायद्याच्या ५२(१) नुसार आदिवासी समाजाच्या सामाजिक तसेच धार्मिक रूढी व प्रथा, समाजाचा पारंपारिक व्यवसाय यांच्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. राज्याच्या प्रचलित कायद्यातील तरतुदी जर विरुद्ध असतील तर त्याबाबत ग्रामसभेला आवश्यक ती कारवाई करून त्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्याची तरतूद या कायद्यामध्ये असल्याचे दिसून येते.

**समारोप :**

एकंदरीत पेसा कायदा ही आदिवासी समाजाच्या स्वशासनासाठी मिळालेली एक अमूल्य अशी देणगी आहे. कारण या कायद्याशी आदिवासींचे संपूर्ण जीवन निगडीत आहे. पंचायत क्षेत्र विस्तार कायदा हा राज्यातील अनुसूचित क्षेत्राला लागू होतो. या कायद्याचा तपशीलवार विचार केल्यास असे दिसून येते की, अगदी गाव घोषित करण्यापासून ते गावाच्या प्रशासनाशी संबंधित सर्व कायदेशीर बाबींचा समावेश या कायद्यात करण्यात आलेला आहे.

पंचायत क्षेत्र विस्तार कायद्यामध्ये ग्रामसभेला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. या कायद्यानुसार तिला घटनात्मक दर्जा प्राप्त झालेला आहे. आदिवासी स्वशासनासाठी या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. याशिवाय दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामसभेतील कामकाजाला एक विशिष्ट स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी ग्रामसभेने पास केलेल्या ठरावांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे.

कोणत्याही कायद्याचे यश हे अंमलबजावणी करणाऱ्या घटकाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. परिणामी अंमलबजावणी करणारी यंत्रणा ही प्रामणिक व कर्तव्यदक्ष असणे महत्वाचे आहे. ग्रामसभेला जरी विकास आरखडा तयार करून योजनेचे प्राधान्यक्रम ठरविण्याचा अधिकार असला तरी सरकारी यंत्रणेची काम करण्याची विशिष्ट पद्धती व कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची मानसिकता या दोन्ही घटकांमुळे ग्रामसभेच्या निर्णयाची अंमलबजावणी होण्यास खूपच अडचणी निर्माण होताना दिसून येतात. याच कारणांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त होऊन जी बळकटी प्राप्त होणे अपेक्षित होते ती झाली नसल्याचे दिसून येते. म्हणून प्रशासकीय यंत्रणेची मानसिकता बदलण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. तरच आदिवासींचा स्वशासनाचा कायदा प्रभावीपणे अमलात आणता येईल.

पेसा कायदा आदिवासींच्या स्वशासनासाठी आवश्यक आहे. मात्र अद्यापपर्यंत आदिवासी लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने त्यांना

याविषयी माहिती नाही. म्हणून या कायद्याचा मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. तसेच या कायद्याविषयी आदिवासी लोकांना माहिती देऊन त्यांना शासन प्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे प्रत्येक प्रदेशाच्या किंवा विभागाच्या स्थानिक गरजा ह्या वेगवेगळ्या असतात. त्याचप्रमाणे विविध भागातील आदिवासींच्या समस्या सारख्याच नसून प्रदेशानुसार त्यांच्या समस्यांचे स्वरूप वेगवेगळे असल्याचे दिसून येते. परिणामी आदिवासींचे स्थानिक प्रश्न व गरजा विचारात घेऊन त्यानुसार या कायद्यामध्ये लवचिकता आणणे आवश्यक आहे.

**संदर्भ:**

१) प्रा. डॉ. मांडे प्रभाकर, भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती जानेवारी २००३.

२) सावे खंडेराव, अनुवादक मीना पाटील, वारली, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९६.

३) वाघमारे एम.एल., पंचायत क्षेत्र विस्तार कायदे १९९६, आणि आदिवासींचा विकास, जुलै २०११.

४) डॉ. गारे गोविंद, आदिवासी विकासातील दीपस्तंभ,श्रीविद्या प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९८.

५) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, ग्रामविकास व जलसंधारण विभाग-४ मार्च २०१४.